WORLD AGRI TOURISM DAY
16 MAY PUNE INDIA

# कृषी पर्यटन विकास संस्था

पहिला मजला, कर्णिक हेरिटेज, फर्ग्युसन रोड, पुणे ४११००४, भारत
फोन : (०२०) २५५३५५९९, २५५३९६००

AGRI TOURISM
Pure Holidayism

Date : 08 / 03 / 2010

# नाविन्यपूर्ण पर्यटन संकल्पनेसाठीचा राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार ॲग्री टुरिझमला प्रदान

पारंपारिक शेतीला कृषी व ग्रामीण पर्यटन व्यवसायाची जोड देऊन ग्रामीण विकासाला चालना देतानाच शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्याची संधी **कृषी पर्यटन विकास संस्था (ए.टी.डी.सी.)** यांच्यामार्फत गेल्या काही वर्षांपासून मिळवून दिली जात आहे. त्याअंतर्गत कार्यरत या संस्थेला केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या वतीने दिला जात असलेला **राष्ट्रीय पातळीवरील २००८-०९ या वर्षीचा 'नावीन्यपूर्ण पर्यटन संकल्पना' या विभागांतर्गत असलेला राष्ट्रीय पर्यटन विशेष पुरस्कार** ३ मार्च २०१० रोजी नवीदिल्ली येथील विज्ञान भवनात भारताचे आदरणीय उपराष्ट्रपती डॉ. हमीद अन्सारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या विशेष सोहळ्यास केंद्रीय पर्यटनमंत्री कु. शैलजा, पर्यटन राज्यमंत्री श्री. सुलतान अहमद, सचिव (पर्यटन) श्री. सुदीप बॅनर्जी आणि अतिरिक्त सचिव (पर्यटन) श्री. कोठारी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

कृषी पर्यटन विकास संस्थेच्या वतीने हा पुरस्कार कृषी पर्यटन संकल्पनेचे जनक श्री. पांडुरंग तावरे यांनी स्वीकारला.

### जागतिक स्तरावरुनही मान्यता

कृषी व ग्रामीण विकासामध्ये अग्रेसर भूमिका घेऊन विविधांगी उपक्रम यशस्वीरित्या राबविणाऱ्या पुणे येथील ॲग्री टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (ए.टी.डी.सी.) या संस्थेतर्फे सन २००८ सालापासून १६ मे हा दिवस 'जागतिक कृषी पर्यटन दिन' म्हणून मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. विशेष म्हणजे १६ मे हा दिवस ए.टी.डी.सी. पुणे या संस्थेचा वर्धापन दिन आहे. कृषी व ग्रामीण पर्यटनाला जागतिक स्तरावरुन चालना मिळावी या उद्देशाने संस्थेने आपला वर्धापन दिनच लोकार्पण करून त्याला 'जागतिक कृषी पर्यटन दिनाचे' स्वरुप प्राप्त करून दिले आहे. संस्थेच्या एकूणच या कार्याची दखल आता आंतरराष्ट्रीय पातळीवरुन घेण्यात आली असून संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संस्था (यु. एन. डब्ल्यू.टी.ओ.) यांनी १६ मे हा दिवस आता यापुढे आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जागतिक कृषी पर्यटन दिन' म्हणून अधिकृतरित्या साजरा केला जाणार आहे.

कृषी पर्यटनाविषयी अधिक माहिती देताना संस्थेचे संचालक (विक्री व विपणन) श्री. पांडुरंग तावरे यांनी सांगितले की, ''कृषी क्षेत्रातील उत्पादनाला, पीकवाढीला काहीवेळा अपरिहार्य अशा अडचणींना तोंड द्यावे लागते. अशावेळी पारंपारिक शेतीला जर पूरक व्यवसायाची जोड दिली तर त्यातून निश्चितपणे आर्थिक फायद्याचा आणखी एक पर्याय शेतकऱ्यांच्या हाती येतो. नेमक्या अशावेळीच कृषी व ग्रामीण पर्यटन हा एक प्रभावी पूरक व्यवसाय ठरतो, हा संदेश आम्ही लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करीत आहोत. या नाविन्यपूर्ण संकल्पनेची दखल आता राष्ट्रीय पातळीवरुनही सरकारने घेतल्याने आमच्या या कार्याला आता अधिक गती येणार आहे. त्यातून विविध ठिकाणी कृषी पर्यटनकेंद्रे उभी राहतील, व तेच आमच्या पुरस्काराचे खरे समाधान असेल.''

### पहिल्या राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

पहिली राष्ट्रीय कृषी पर्यटनाची कार्यशाळा दिल्ली येथे १८ मार्च २०१० रोजी 'ॲसोचेम' दिल्ली व 'मार्ट'च्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून यामध्ये देशभरातील मान्यवर तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक, व्यावसायिक आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी, कृषी पर्यटन केंद्र चालकांनीही मोठ्या संख्येने यात सहभागी होऊन प्रगतीच्या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन श्री. तावरे यांनी केले आहे.

---

**मा. महोदय, सस्नेह नमस्कार.** आपल्या माहितीस्तव सोबतचे वृत्त पाठवीत आहोत. कळावे, आपला स्नेहांकित,

**टीप : सोबत पुरस्कार वितरणाचे छायाचित्र असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे,**
**छायाचित्रात (डावीकडून) श्री.कोठारी, ना. श्री. सुलतान अहमद,**
**महामहीम उपराष्ट्रपती डॉ. हमीद अन्सारी, ना. कु. शैलजा, श्री. सुदीप बॅनर्जी**
**व पुरस्कार स्वीकारताना श्री. पांडुरंग तावरे**

**पांडुरंग तावरे**
(संचालक - विक्री व विपणन)
ए. टी. डी. सी., पुणे

---